दैनिक अन्यायाचा प्रतिकार महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
• वर्ष १६ वे • अंक ३४३ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.९ मार्च २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## गोव्यात सत्तास्थापनेसाठी काँग्रेसच्या हालचाली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एक्झिट पोलचे आकडे आल्यानंतर गोव्यात सत्ता स्थापनेसाठी काँग्रेसनं हालचाली सुरु केल्या आहेत. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पी. चिदंबरम आणि महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाच्या प्रमुखांमध्ये गुप्त बैठक झाल्याची माहिती आहे. २०१७ सालाप्रमाणे यावेळी गाफील न राहण्याचं काँग्रेसनं ठरवल्याचं दिसतंय काँग्रेस नेते गोव्यातल्या स्थानिक पक्षांच्या संपर्कात असल्याचं समोर आलंय.

सोमवारी जाहीर झालेल्या एक्झीट पोलनंतर गोव्यात सरकार स्थापनेच्या हालचालींना वेग आलाय. पोलमध्ये भाजप आणि काँग्रेसमध्ये अटीतटीची लढत असल्याचं पाहायला मिळतंय. मात्र सरकार स्थापनेसाठी स्थानिक पक्षांशिवाय भाजप किंवा काँग्रेसचीही डाळ शिजणार नाही. अशा स्थितीत सुदिन ढवळीकर यांनी प्रमोद सावंताना थेट विरोध दर्शवलाय. गोव्यात सत्ता स्थापनेसाठी भाजपवर मुख्यमंत्रीपदाचा चेहरा बदलण्याची नामुष्की ओढावू शकते. एक्झिट पोलच्या आकड्यांनुसार मगो पक्ष किंग मेकरच्या भूमिकेत आहे. भाजप आणि काँग्रेस दोन्ही पक्षांचे नेते आमच्या संपर्कात असून कोणासोबत सरकार स्थापन करायचं याबाबत १० तारखेला निर्णय घेऊ असं सुदिन ढवळीकर यांनी म्हटलंय.

### आश्वासनानंतरही स्थानिक मच्छिमारांना आर्थिक नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ

# १४ मार्चपासून न्हावा-शिवडी सी-लिंकचे काम बेमुदत बंद पाडण्याचा इशारा

**दै.रायगड नगरी । उरण**

न्हावा-शिवडी सी-लिंक प्रकल्पाचे काम सुमारे ७० टक्क्यापेक्षा अधिक पुर्ण झाले असले तरी खरे बाधीत असलेल्या न्हावा आणि न्हावाखाडी येथील ७८९ बाधीत स्थानिक मच्छिमारांना अद्यापही नुकसान भरपाईच मिळालेली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या न्हावा ग्रामस्थांनी येत्या १४ मार्च २०२२ पासून ग्रामपंचायतीच्या हद्दीत सुरू असलेल्या शिवडी - न्हावा सी-लिंक प्रकल्पाचे काम बेमुदत बंद करण्याचा निर्वाणीचा इशारा सर्व पक्षीय ग्रामस्थांनी काल आयोजित पत्रकार परिषदेतून दिला आहे.



न्हावा आणि गव्हाण ग्रामपंचायतीच्या हद्दीतील गावे ही न्हावा-शिवडी सी-लिंक प्रकल्पाच्या दोन किमी अंतरावर आहेत.या गावातील बहुसंख्य लोकांचा पारंपारिक मासेमारी हाच व्यवसाय आहे. या प्रकल्पामुळे मात्र येथील लोकांचा पारंपारीक मासेमारी व्यवसाय धोक्यात आला असुन त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. या गावातील बहुतांश लोकांची मासेमारीवरच उपजिवीका होत आहे. त्यामुळे येथील मासेमारी करणाऱ्या कुटूंबियांना अर्थिक नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी येथील ग्रामस्थांची आहे.

एमएमआरडीएनेही अनेकदा सर्व्हेक्षण करून स्थानिक मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याची तयारी दर्शविली होती.त्यानुसार २९० मच्छिमारांना आर्थिक नुकसानीचा पहिला हप्ता देण्यात आला होता.मात्र बाधीत मच्छिमारांची तयार करण्यात आलेल्या यादीपैकी ७८९ मच्छीमारांना अद्यापही आर्थिक नुकसानीची रक्कम मिळालेली नाही.याबाबत ग्रामस्थांनी पात्र असलेल्या मच्छीमारांना आर्थिक नुकसान भरपाईची रक्कम मिळावी यासाठी एमएमआरडीएकडे विनंती केली होती.

ग्रामस्थांच्या विनंतीनुसार २६ मार्च २०२१ रोजी एमएमआरडीएने ग्रामसभा घेऊन आर्थिक नुकसानीसाठी पात्र असलेल्या मच्छिमारांची यादी तयार करण्याचे ग्रामपंचायतीला कळविण्यात आले होते.त्यानुसार २ आक्टोंबर २०२१ रोजी एमएमआरडीए, मत्स्यविभाग, पोलिस आदी प्रतिनिधींच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या ग्रामसभेत एकूण ७८९ बाधीत मच्छी मच्छिमारांची यादी तयार करण्यात आली होती. तयार करण्यात आलेल्या नुकसानपात्र ७८९ मच्छिमारांच्या यादीचे सार्वजनिकरित्या वाचनही करण्यात आले होते.

मात्र त्यानंतरही बाधीत मच्छिमारांना एमएमआरडीएकडून आर्थिक नुकसानीची रक्कम देण्यात टाळाटाळ केली जात आहे.वारंवार पत्रव्यवहार, निवेदन, चर्चा, बैठकांनंतरही एमएमआरडीएकडून आर्थिक नुकसानीची रक्कम देण्यासाठी उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत. एमएमआरडीएकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्यामुळेच संतप्त झालेल्या सर्वपक्षीय ग्रामस्थांनी न्हावा ग्रामपंचायतीच्या हद्दीतील ७८९ बाधीत मच्छिमारांना जोपर्यंत आर्थिक नुकसानीची रक्कम दिली जात नाही तोपर्यंत १४ मार्च २०२१पासून न्हावा शिवडी सी-लिंकचे काम बेमुदत बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती ग्रामस्थांनी काल ८ मार्च रोजी आयोजित पत्रकार परिषदेतून दिली आहे.

या पत्रकार परिषदेला न्हावा ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत भोईर, न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच हरेश्चंद्र म्हात्रे, उपसरपंच मंजुषा ठाकूर, सदस्य किसन पाटील,सागर ठाकूर, प्रल्हाद पाटील, देवेंद्र भोईर, सदस्या विजया ठाकूर, निर्मला ठाकूर, कल्पना घरत, माजी सरपंच हनुमान भोईर, माजी अध्यक्ष आशिष पाटील, शाखाप्रमुख संजय ठाकूर, न्हावा राष्ट्रवादीचे अध्यक्ष राकेश पाटील, न्हावा शेकाप अध्यक्ष जयंत पाटील, समाजसेवक राम मोकल, सुजित ठाकूर, प्रकाश कडू हनुमंत आदी सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पनवेल शहर पोलीस ठाण्यात महिला राज

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पोलीस दलात महिलांचे प्रमाण जेमतेम असले तरी मंगळवारचा दिवस त्यांच्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला. ८ मार्च रोजी महिला दिनाचे औचित्य साधत पनवेल शहर पोलीस ठाण्याची धुरा महिलांनी सांभाळून प्रत्यक्ष कामकाजात भाग घेऊन सगळी कामे केली. अतिशय सक्षमपणे महिला पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दिवसभर पोलीस ठाणे सांभाळले. येणाऱ्या नागरिकांच्या तक्रारींचे निरासन करण्यापासून सर्व जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. याबद्दल वरिष्ठ पोलीस निरिक्षक विजय कादबाने यांनी महिलांचे कौतुक केले.

कधी काळी चूल आणि मूल सांभाळणार्या महिला आता पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात काम करत आहेत. असे असले तरीही अजून काही क्षेत्रात पुरुष मंडळींची मक्तेदारी आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रात महिला पोहोचल्या असल्या तरीही अनेक क्षेत्रात महिलांची संख्या नगण्य आहे. ज्या क्षेत्रात पुरुषी वर्चस्व आहे अशा ठिकाणी महिलांना प्रोत्साहन देऊन त्यांना सन्मानाची वागणूक देण्याची गरज आहे.

महासंचालक यांच्या आदेशानुसार ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनी महिलांचा सन्मान म्हणून प्रत्येक ठाण्यात ठाणे अंमलदार म्हणून महिला कर्मचार्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्याच्या इतिहासात हा आगळा वेगळा महिला दिन म्हणून स्वागतार्ह बाब आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्याचा कारभार वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी पोलीस उपनिरीक्षक मोनाली चौधरी यांच्याकडे महिला दीनानिमित्ताने पनवेल शहर पोलीस ठाण्याची एक

.../२

> महिला दिनी पनवेल शहर पोलीस ठाण्याचा कारभार सांभाळण्याची संधी मिळाल्याने महिला पोलिसांचे मनोबल वाढण्यासाठी नक्कीच मदत होणार आहे. मला आज काम करण्याची मिळालेली संधी म्हणजे नारी शक्तिला सलाम म्हणावा लागेल. वरिष्ठांनी घेतलेला निर्णय प्रेरणादायी आहे.
>
> **मोनाली चौधरी, पोलीस उपनिरीक्षक, पनवेल शहर पोलीस ठाणे**

### पनवेल तालुका पत्रकार महासंघाचा अनोखा उपक्रम

## जागतिक महिला दिनी कुष्ठरुग्ण कुटुंबांना अन्नधान्याचे वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे जेष्ठ सल्लागार तथा दैनिक रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनिल पोतदार आणि जेष्ठ सल्लागार तथा दैनिक किल्ले रायगडचे संपादक प्रमोद वालेकर यांच्या मार्गदर्शनानुसार पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष तथा रायगड शिव सम्राटचे संपादक रत्नाकर पाटील आणि श्री भगवती साई संस्थानचे अध्यक्ष खेमचंद गोपलानी, सचिव रामलाल चौधरी यांच्या नियोजनाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पनवेल तालुका पत्रकार महासंघ आणि श्री भगवती साई संस्थान यांच्यावतीने पनवेल येथील कुष्ठरूग्ण वसाहतीत अन्नधान्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे जेष्ठ सल्लागार प्रमोद वालेकर, अध्यक्ष रत्नाकर पाटील, जेष्ठ पत्रकार, दैनिक सामनाचे प्रतिनिधी संजय कदम, दैनिक किल्ले रायगडचे प्रतिनिधी प्रदिप वालेकर, रायगड शिव सम्राटचे प्रतिनिधी सुभाष वाघपंजे, वतन कर्नाळाचे प्रतिनिधी शेखर भोपी, गणेश कुष्ठरोग सेवा संघाचे सचिव अध्यक्ष अशोक आंबेकर यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष रत्नाकर पाटील म्हणाले की, कुष्ठरूग्ण कुटुंबीयांना दैनंदिन जीवनात अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, त्यामुळे त्यांचे जीवन सुसह्य होण्यासाठी पनवेल तालुका पत्रकार महासंघातर्फे धान्य वाटप करून अल्पसा प्रयत्न केला आहे, असे प्रतिपादन रत्नाकर पाटील यांनी केले. यावेळी उपस्थितांचे आभार व्यक्त करताना जेष्ठ सल्लागार प्रमोद वालेकर म्हणाले की, आपण आमच्या विनंतीला मान देऊन वेळात वेळ काढून कार्यक्रमाला उपस्थित राहून जागतिक महिला दिन साजरा केल्याबद्दल आम्ही समाधानी असल्याचे सांगितले. तत्पूर्वी उपस्थित पत्रकारांचे गणेश कुष्ठरोग सेवा संघाचे सचिव अध्यक्ष अशोक आंबेकर यांनी गुलाबपुष्प आणि पेन देऊन स्वागत केले.

## संक्षिप्त...

### महसूल राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांना नोटीस बजावण्याचे आदेश



**दै.रायगड नगरी । मुंबई**

शासनाचा निर्णय डावलून वाळू ठेक्यासाठी जागा दिल्याप्रकरणी महसूल राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांना नोटीस बजावण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत. याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करू नये, असेही आदेश खंडपीठाने दिले आहेत.

शासनाने २०१२-१३ ला शेख सलीम अब्दुल कादर पटेल यांना कुरण-पिंपरी येथे वाळूचा ठेका दिला होता. परंतु, पटेल यांनी अटींचा भंग केला. त्यामुळे त्यांना नऊ कोटी ७६ लाख रुपये दंड आकारून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पटेल यांना दोन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा झाली होती. त्यावर पटेल यांनी शिक्षेविरोधात अपील केली होती. परंतु, त्यांचा अपीलाचा अर्ज न्यायालयाने फेटाळला होता.

### बोगस आयकर अधिकारी यांचा केला चिपळूण पोलीसांनी पर्दाफाश

## 3 किलो सोन्यासह ९ लाखाची रोकड केली हस्तगत ; ५ आरोपी ताब्यात

### पोलीस अधिक्षक मोहीत कुमार गर्ग यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**

**पनवेल** : रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथील भर बाजारपेठेत सोन्याचे दागीने बनविणारा एका कारागीराकडे आम्ही आयकर अधिकारी असल्याचे भासवुन त्याला दमात घेऊन त्याच्याकडील ३ कीलो सोने व ९ लाखाची रोकड ताब्यात घेऊन त्याचे चिपळूण येथून चक्क अपहरण करण्यात आले होते.



या बाबत सविस्तर हकीकत अशी चिपळुण येथील एक परप्रांतीय कारागीर अश्रफ शेख हा चिपळूण येथे अनेक वर्षे सोन्याचे दागीने बनविण्याचे काम करीत आहे. चिपळूण परीसरातील विविध सोन्याचे व्यावसायिक त्याच्या कडुन ऑर्डर प्रमाणे दागीने घडवुन घेत असतात त्यामुळे साहजिकच अश्रफ शेख कडे सोने व काही रोकड कॅश जवळ असणे स्वाभाविक आहे. चिपळूण येथील ओतारी गल्लीत त्याचा हा व्यवसाय अनेक वर्षे सुरू आहे. शक्यतो हे कारागीर दिवसा ऑर्डर मिळविण्यासाठी विविध ज्वेलर्स मध्ये जात असतात व रात्री निवांत दागीने घडविण्याचे काम करीत असतात. रविवारी अचानक रात्री काही इसम त्याच्या दुकानात शिरले व आम्ही आयकर अधिकारी असल्याचे सांगुन अश्रफ यास बनावट ओळखपत्र दाखवुन आम्हाला आमच्या तपासात सहकार्य करा त्यावर अश्रफ शेख यांनी विश्वास ठेवुन त्या आलेल्या त्रीकुटाला आपल्या कडील दागीने दाखविले व वजन केले व सुमारे ९ लाखाची रोकडही दाखवताच अचानक त्या तीघांनीही सर्व ऐवज स्वतःकडे घेऊन व अश्रफला ताब्यात घेऊन अधिक चौकशीसाठी आमच्या बरोबर आपणास यावे लागेल असे बोलुन सोबत आणलेल्या गाडीत बसवुन अश्रफ शेख सोबत ते तीघेही बोगस अधिकारी व अन्य दोन रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात त्याला घेऊन आले व अश्रफ याला दम देऊन एका लक्झरीत बसवुन चिपळूणकडे रवाना केले व सदर त्रीकुट व अन्य पुण्याच्या दिशेने आपल्या ताब्यातील वाहनासह फरार झाले. सदर बातमी चिपळूण शहरात वाऱ्यासारखी पसरली. आपल्या पतीचे अपहरण झाले व काही इसम त्याला कुठेतरी बरोबर घेऊन गेले हे समजताच अश्रफच्या पत्नीने चिपळूण पोलीस ठाण्यात तशा आशयाची तक्रार देताच चिपळूण पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र शिंदे यांनी तात्काळ पोलीस अधिक्षक मोहीत कुमार गर्ग यांच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन तात्काळ पुणे पोलीसांची संपर्क करून व आपल्या पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वामी, सहाय्यक पोलीस निरीक्षक साळोखे तसेच इतर कर्मचारी यांची एक सक्षम टीम तात्काळ पुणेच्या दिशेने रवाना करण्यात आली. कोणताही सदर गुन्हाचा धागादोरा ठोस नसतानाही चिपळूण पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र शिंदे यांनी पुण्यातुन या अपरहरण तसेच जबरी चोरीच्या कटात सामील असलेल्या ५ चोरट्यांना एका लॉजमधुन पुणे पोलीसांची मदत घेऊन या आरोपींना मुद्देमालासह ताब्यात घेतल्याने चिपळूण पोलीसांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

## खालापूर पंचायत समितीची इमारत दुरून डोंगर साजरे




**दै.रायगड नगरी । खोपोली**

औद्योगिक तालुक्यातील पंचायत समिती म्हणून खालापूर पंचायत समितीचे रायगड जिल्ह्यात मोठे नावलौकीक आहे. त्यादृष्टीने लाखो रूपये खर्च करून खालापूर पंचायत समितीची इमारत बांधण्यात आली होती. मात्र, या इमारतीचे काम अक्षरशः निष्कृष्ट दर्जाचे झाले असल्याचे चित्र दिसून येत आहे. काही वर्षातच या इमारतीने दम तोडला आहे आणि आता या इमारतीच्या दुरूस्तीकडे गटविकास अधिकारी यांचे लक्ष नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पंचायत समितीतील अधिकारी, कर्मचारी व नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे.

पंचायत समिती अर्थ विभागाचे दालन असो की, सहायकांचे भिंतीवर भले मोठे तडे, दरवाजे चौखट तुटून पडण्याच्या अवस्थेत, तर काही ठिकाणे स्लॅबचे काही भागचे तुकडे पडत असल्याचे दिसून येत आहे. लाखो रुपये खर्च करून देखील इमारतीचे निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचे दिसून येत आहे. पहिला मजला मात्र झक्कास करण्यात आला तर तळ मजल्याला निधी मिळाला नाही का? असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे.

खालापूर पंचायत समितीच्या इमारतीचे काम असे असेल तर बेचाळीस ग्रामपंचायतीमध्ये विकास कामे कशी असतील? गट विकास अधिकारीच्या पंचायत समितीमध्ये कामे निकृष्ट दर्जाची होत असतील? तर ग्रामपंचायतीमध्ये व्हिजिट लावून कामे किती दर्जेदार होत असतील? गट विकास अधिकारी यांचे तालुक्यात काम तरी नक्की कोणते? असा संताप सवाल

.../२

## स्फोटके नष्ट करताना स्फोट, तीन पोलीस कर्मचारी गंभीर जखमी

**दै.रायगड नगरी । महाड**

महाड तालुक्यात कांबळे तर्फे महाड गावाजवळ पोलिसांनी जप्त केलेला जुना विस्फोटक मुद्देमाल नष्ट करत असताना झालेल्या स्फोटात तीन पोलिस कर्मचारी गंभीररित्या जखमी झाले आहेत. दोन्ही पोलिस कर्मचाऱ्यांवर महाड ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून मुंबई येथे हलवण्यात आले आहे. हा मुद्देमाल कांबळे येथील एका दगड खाणीत नष्ट करताना अपघात झाला.

मिळालेल्या माहितीनुसार महाड औद्योगिक पोलीस ठाण्यांमध्ये पूर्वी जप्त केलेला विस्फोटक मुद्देमाल नष्ट करण्याचे आदेश पोलिस अधिकाऱ्यांकडून मिळाल्यानंतर कांबळे तर्फे महाड येथील एका दगड खाणे हा मुद्देमाल नष्ट करत असताना मोठा स्पोर्ट झाला. या स्फोटांमध्ये अलिबाग येथून आलेले तीन पोलिस कर्मचारी गंभीररित्या जखमी झाले आहेत. राहुल दोशी, रमेश कुटे, आशीर्वाद लगदे अशी जखमी झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची नावे आहेत.

.../२

**शॉप विकणे आहे**
पनवेल महानगरपालिका हद्दीत ६१५ बिल्टअप एरिया असलेले शॉप विक्री करणे आहे.
-: संपर्क :-
9321592113
8104477440

# शेतकऱ्यांना नडणाऱ्या सबरजिस्टरला लगाम घाला : उदय पाटील

**दै.रायगड नगरी । कर्जत**

शासनाने तुकडा बंदीचा कायदा पास केला त्यामुळे पूर्वी प्रमाणे जमिनीचा छोटा तुकडा विकण्यास निर्बंध आले. स्वतंत्र सात बारा असूनही लहान तुकडा असेल तर जमीन खरेदी चे रजिस्टर करण्यासाठी कजपा (कमी जास्त पत्रक) असणे आवश्यक झाले.याचाच फायदा घेऊन कर्जत चे सबरजिस्टर लाखोंची कमाई करीत आहेत असा आरोप कर्जत तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते उदय पाटील यांनी सोशल मीडिया वर केला आहे.

एखाद्या शेतकऱ्याला व्यवसाय करण्यासाठी किंवा काही तातडीच्या कामासाठी पैसा उभारायचा असेल तर जमीन विक्री शिवाय पर्याय नसतो. याकरिता तो आपल्या मिळकतीतील जमिनीचा एखादा तुकडा विकु पाहतो. जमीन खरेदी करणारी व्यक्ती शेतकऱ्याला काही बयांना रक्कम भरून शासकीय दराप्रमाणे स्टॅम्पड्युटी भरते. पण खरेदी खताचे वेळी सबरजिस्ट्रार साहेब शासन आदेश दाखवून अढी मारतात आणि क.जा.प. ची मागणी करतात.

जमिनीचा सर्वे करून क.जा.प. मिळवण्यासाठी सिटी सर्वे च्या कार्यालयात गेल्यावर कळते की कर्जत तालुक्यासाठी एकच मोजणी अधिकारी आहे. सामान्य आणि तातडीची मोजणी बंद होऊन फक्त अतितातडी मोजणी चा पर्याय उपलब्ध आहे. याची फी भरमसाट असली तरी मोजणीला किमान चार महिने लागतात. म्हणजे कजाप साठी मोठी फी भरून देखील चार पाच महिने थांबावे लागणार. ठरलेल्या व्यवहारा पोटी इतका वेळ थांबणे कोणालाही शक्य नसते. याचाच फायदा घेऊन सबरजिस्ट्रार आणि त्यांच्या एजंट कडून लूटमार होते. त्यांची मागणी किमान पंचवीस हजारा पासून काही लाखांच्या आसपास असते. शेतकऱ्याला बयांना पोटी दिलेली रक्कम सोडणे किंवा साहेबांची मागणी पूर्ण करणे हेच पर्याय उरतात. आणि घेणार देणार अर्धी अर्धी रक्कम काढून साहेबांची कृपादृष्टी प्राप्त करून घेतात. नोटांचा पुडका मिळाल्यावर शासन नियमाच्या क जा प ची गरज उरत नाही.

कर्जत सबरजिस्टर कार्यालयातील गेल्या वर्षभरात नोंदणी झालेल्या दस्तानची चौकशी केली तर यातील नियमितता किंवा या अनियमितता लक्षात येऊन टेबला खालून किती कोटींची उलाढाल झाली हे लक्षात येईल. लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी याबाबत आवाज उठवून या पिळवणुकीला आळा घालण्यासाठी प्रयत्न करावेत अशी गोरगरीब जनतेची अपेक्षा आहे.

## अरुण लक्ष्मण पाटकर यांचा गौरव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र राज्य पावरलिफ्टिंग असोसीएशन आणि महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ व महाक्रीडा प्रबोधिनी यांच्या सहकार्याने महाराष्ट्र राज्य क्लासिक निवड चाचणी स्पर्धा दिनांक ०५/०३/२०२२ ते ०६/०३/२०२२ या कालावधीत महाराष्ट्र कामगार क्रीडा भवन प्रभादेवी मुंबई येथील नामांकित कामगार स्टेडियममध्ये आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सबज्युनिअर, ज्युनिअर, सिनिअर, मास्टर अशा प्रकारच्या पुरुष व महिला गटात स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत श्री.अरुण लक्ष्मण पाटकर यांनी केलेल्या कामगिरीबाबत महाराष्ट्र राज्य पावरलिफ्टिंग संघटनेचे जनरल सेक्रेटरी श्री.संजय सरदेसाई यांनी दखल घेऊन उत्कृष्ट पंच म्हणुन दुसरा क्रमांक दिला. त्याबद्दल कामगार कल्याण विकास अधिकारी श्री.श्रीकांत धोत्रे यांचे हस्ते मानाची ट्रॉफी श्री.अरुण पाटकर (रायगड जिल्हा) यांना देण्यात आली. या पूर्वीसुध्दा कोल्हापूर येथील स्पर्धेत पाटकर यांना २रा क्रमांक प्राप्त झाला होता. श्री.अरुण पाटकर यांनी आपल्या यशाबाबत महाराष्ट्र राज्य पावरलिफ्टिंग सेक्रेटरी श्री.संजय सरदेसाई आणि निवड समितीचे श्री.राजहंस मेहंदळे(पुणे जिल्हा)आणि त्यांचे निवड समिती सहकारी यांचे आभार मानले आहेत. तसेच रायगड पावरलिफ्टिंगचे श्री.गिरीष वेदक, श्री.सचिन भालेराव,श्री.राहुल गजरमल आणि खोपोलीचे ज्येष्ठ क्रीडा कार्यकर्ते शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त श्री.मारुती अडकर सर,संदीप कृष्णा पाटकर,मिलिंद पांचाळ यांनी अभिनंदन केले आहे.



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड येथील महसूल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी या जमिनीचे मालक बळीराम महादेव ठाकूर, जोमुबाई रामचंद्र गावंड, नरेंद्र परशुराम ठाकूर, किरण परशुराम ठाकूर, अजित परशुराम ठाकूर सर्व रा.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.प्रती | आकार |
|---|---|---|---|
| १९४ | १ | ०-६०-५०<br>पो.ख.०-०५-३०<br>एकूण ०-६५-८० | ४.९४ |

वरील वर्णनाची शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी रस्ता, पाणी येण्या-जाण्याचा रस्ता अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यासंबंधची व्यक्ती किंवा संस्थानी आपली हरकत पुराव्यासह लेखी कागदपत्रांच्या स्वरुपात स्वतःहून हजर होवून आमचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत कळवावे. वरील मुदतीत कोणीही कसलीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही असे समजण्यात येईल किंवा असल्यास तो हक्क व हितसंबंध त्यांनी आमचा अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभात होणाऱ्या खरेदीखतांस कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करयात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास ती हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.०८/०३/२०२२
स्थळ : उरण

**सही/-**
**ॲड.योगेश नामदेव म्हात्रे**
**रा.कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड**
**९८१९९१०८०८/८०९७१०८०६०**

ॲड.अजित धनराज म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश, पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.५/२०२२
नि.नं.१२/ड
ने.ता.२१/०३/२०२२

कु.सचिन लक्ष्मण वाघमारे — अर्जदार
विरुद्ध
सौ.भारती शिवाजी हिलम वगैरे — सामनेवाला

याद्वारे जाहीर करण्यात येते की, पनवेल येथील मे.अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयातील दिवाणी चौकशी अर्ज नं.५/२०२२ नुसार अर्जदार यांस कु.रंजना लक्ष्मण वाघमारे यांच्या हिश्श्याची अथवा त्याला मिळणाऱ्या बँक ऑफ इंडिया शाखा कर्जत येथील बचत खाते क्र.१२०५१२११०००० ५६९ रक्कम स्वीकारण्याकरिता व मौजे : कांदिवडे घर क्र.६९ क्षेत्र ५०० चौ.फुट विकण्याकरिता अर्ज केलेला आहे. अर्जदार यांची आई कै.गुलाब लक्ष्मण वाघमारे यांचा मृत्यू दि.७/८/२०१६ रोजी एम्स हॉस्पिटल, डोंबिवली, ता.कल्याण येथे झाले असून त्यांचे वडील कै.लक्ष्मण नाना वाघमारे यांचे निधन दि.०१/०२/२०१५ रोजी यांच्या राहत्या घरी रा.खरवंडी, पो.कांदिवडे मयत झालेले आहेत. अर्जदार कु.सचिन लक्ष्मण वाघमारे यांचे व्यतिरिक्त कु.रंजना लक्ष्मण वाघमारे यांचे अज्ञान पालनकर्ती जनक भाऊ म्हणून कोणाचेही हरकत, हक्क अधिकार किंवा हितसंबंध असतील तर त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत आपला हक्क हितसंबंधाबाबत योग्य तो कायदेशीर पुरावा घेवून किंवा दिनांक २१/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर रहावे, अन्यथा कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन मे.कोर्ट पुढील कारवाई करेल. सदर नोटीस आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्यासह दिले.

दि.०८/०३/२०२२

**सही/-** **क.लिपीक** **अति.जि.न्याया, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **अति.जि.न्याया, पनवेल**

मा.श्री.सोनावणे साहेब
ॲड.नवनाथ कोकणे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१९७४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०७/०४/२०२२

१) राणी भीमराव बनसोडे
वय : ४६ वर्षे, नोकरी : गृहिणी
२) वर्षा भीमराव बनसोडे
वय : १० वर्षे, नोकरी : काहीच नाही
३) वरदाद भीमराव बनसोडे
वय : २ वर्षे, नोकरी : काहीच नाही
सर्व रा.फ्लॅट क्र.०७, अमृत वेल कॉम्प्लेक्स,
प्लॉट नं.१०/ए, सेक्टर ०७, कामोठे,
रायगड, महाराष्ट्र-४१०२०६ — अर्जदार

अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ आणि ३ यांचे वडील कै.भीमराव किसनराव बनसोडे हे दि.२६/०४/२०२१ रोजी अंबाजोगाई येथे मयत झालेले आहेत. तसेच कै.भिमराव किसनराव बनसोडे यांची पहिली पत्नी कै.सुजाता भिमराव बनसोडे दि.१९/०९/२०२० रोजी उस्मानाबाद येथे मयत झालेले आहेत. सदरहू मयत कै.भीमराव किसनराव बनसोडे कै. सुजाता भिमराव बनसोडे यांचे मृत्यूसमयी त्याचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**फ्लॅट क्र.०७, अमृत वेल कॉम्प्लेक्स,**
**प्लॉट नं.१०/ए, सेक्टर-०७, कामोठे,**
**नवी मुंबई-४१०२०६**
**क्षेत्र ४१.१४ चौ.फूट बिल्टअप**

वरील मिळकतीबाबत अर्जदार ह्यांनी वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशा कोणत्याही प्रकारची तक्रार, वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत मुदतीत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

ही नोटीस आज दि.८ माहे मार्च २०२२ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

### जाहीर नोटीस

याद्वारे तमाम लोकांस कळविण्यात येते आहे की, आमचे अशिल सुर्यकांत रविशंकर गुप्ता, रा.३०४ ए, ए विंग, अमिरा अपार्टमेंट, सरकारी दवाखानाजवळ, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड यांनी खालील वर्णन केलेली मिळकत श्री.भगवान मारुती भोईर यांचे कुलमुखत्यारी म्हणून श्री.लक्ष्मीकांत रामचंद्र सोनी, रा.कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडून नोंदणीकृत करारनाम्याने खरेदी केली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकत सर्व्हे नं./ हिस्सा नं. १७४/३१ अ या मिळकतीवरील भोईर इमारतीमधील तळमजल्यावरील दुकान गाळा क्र.९ क्षेत्र १९० चौ.फुट सुपर बिल्टअप**

सदर मिळकतीचा करारनामा मा.दुय्यम निबंधक कर्जत यांचे कार्यालयात नोंदणी अनुक्रमांक १०७५/२००७ अन्वये दिनांक १४ फेब्रुवारी २००७ रोजी रितसर नोंदविलेला आहे.

सदर विक्रीच्या करारनाम्याचा मुळ दस्तऐवज आमचे अशिल सुर्यकांत रविशंकर गुप्ता यांचे ताब्यात होता. सदरचा दस्ताऐवज मौजे : कर्जत येथे, कर्जत पोलीस ठाणे यांचे हद्दीत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेताना, दिनांक १९ फेब्रुवारी २०२२ रोजी गहाळ झालेला आहे. त्याबाबतची पोलीस ठाणे कर्जत येथे दिनांक २१ फेब्रुवारी २०२२ रोजी तक्रार दाखल केलेली आहे. त्यांचा नोंदणी क्र.१०२६ असा आहे.

ज्या कोणाही व्यक्तीच्या ताब्यातील वर नमूद केलेला मुळ दस्तऐवजाचा गैरवापर केल्याचे आढळून आल्यास आमचे अशिल त्यांचेविरुद्ध आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार राखून ठेवीत आहेत.

या जाहीर सुचनेद्वारे असे सुचित करण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या मिळकतीचा मुळ दस्तऐवज ज्या कोणास मिळालेला असेल त्यांनी तो दस्तऐवज आमचे अशिलांस अथवा आम्हास द्यावा. किंवा जवळच्या पोलीस स्टेशन येथे त्याबाबत माहिती द्यावी.

सदरच्या दस्तऐवजाचा गैरवापर होवू नये या उद्देशाने ही जाहीर सुचना प्रसिद्ध करीत आहोत.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दि.९ मार्च २०२२

**सही/-**
**अधिवक्ता सौ.गायत्री घनःश्याम परांजपे**
**एम.कॉम.एलएल.बी.**
**एमएएच ६९५८/२०१९**
**अमिरा स्टेटस, कर्जत नगरपरिषद कार्यालयासमोर,**
**मु.पो.कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड**
**९२८४६८३३२९**



# ज्योत्सना ठाकूर रयत शिक्षण संस्था लाईफ वर्करपदी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत महाविद्यालय गव्हाण कोपर येथील शिक्षिका ज्योत्सना सुधीर ठाकूर यांची रयत शिक्षण संस्था लाईफ वर्करपदी निवड झाली आहे.

त्याबद्दल भाजपचे तालुकाध्यक्ष व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, प्राचार्या साधना डोईफोडे, पर्यवेक्षक दीपक भरमूके, वसंत पाटील, अनंता ठाकूर, सुधीर ठाकूर, किशोर पाटील, भाऊ भोईर, बाबुराव कांबळे, जयवंत देशमुख, अशोक कडू, आशिष घरत, कमलाकर घरत आदी उपस्थित होते.





## पनवेल महानगरपालिका

ता.पनवेल, जि.रायगड - पिन नं.४१० २०६

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.: ०२२-२७४५२२३३
Email : panvelcorporation@gmail.com

कार्यालय जा.क्र.पमपा/कर/हस्तां/२२२१/९३२/२०२२ दिनांक : ०४/०३/२०२२

**वाचा :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १ ते ४**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पनवेल महानगरपालिकेकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

| अ. क्र. | भाग क्र. | स.नं./प्रॉ.नं./फा.प्लॉट नं. सदनिका/गाळा क्र. | जुने नाव | नविन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | १६ | फा.प्लॉट क्र.४४८, सदनिका क्र.६०२, रिव्हरसाईड पार्क, मोराज एस-४,५,६ टाईप सोसा, तक्का, पनवेल | हिमांशु एस शाह, हेमलता प्रकाश कोलवणकर | संदीप कृष्णा पाटील, नयना संदीप पाटील |
| २ | १४ | फा.प्लॉट क्र.३१, सदनिका क्र. ७, मंदारज्योत सोसा, पनवेल | दिपक वल्लभदास सचदेव, हीनय जितेंद्र दवे, पुर्णिमा प्रकाश उपाध्या | परेश महादेव पोटले, कल्पिता परेश पोटले |
| ३ | १३ | फा.प्लॉट क्र.४१३/३/१ व ४१३/३/२, सदनिका क्र. २०२, नवमाधुली सोसा, पनवेल. | एम.आर. चंद्रशेखर उर्फ चंद्रशेखर गणीगा | शोभा गणपत बिरादार, गणपत धुल्लाप्पा बिरादार, संगमेश गणपत बिरादार |
| ४ | १४ | सर्व्हे क्र. ७९७/२, सदनिका क्र. डी-४०१, गोविंद सागर सोसा, पनवेल. | मे. प्रियल असोसिएटस | जमीलुद्दीन तालुगदार |
| ५ | १६ | फा.प्लॉट क्र.४४८, सदनिका क्र.१०३, मोराज आर-१ सोसा, तक्का, पनवेल | स्नेहा मिथुन उर्फ स्नेहा सी. नायर, मल्लिका चंद्रशेखरन नायर | रविंद्र लक्ष्मण म्हात्रे, रचना रविंद्र म्हात्रे |
| ६ | १६ | फा.प्लॉट क्र.४४८, सदनिका क्र.४०४, मोराज आर-१ सोसा, तक्का, पनवेल | शिवराम दशरथ थोरात | रमा प्रेम गोयल, प्रेम वेदप्रकाश गोयल |
| ७ | १६ | प्लॉट क्र.२९०/१, गाळा क्र.२९०/१, नॅशनल पॅरडाईज सोसा, पनवेल | नीरज अवधेश उपाध्याय यांच्या तर्फे कु.मु. म्हणुन श्री. अवधेश उपाध्याय | रजत प्रेमकुमार गोयल |
| ८ | १६ | फा.प्लॉट क्र.४५२, सदनिका क्र. ३०५, नॅशनल पार्क सोसा, पनवेल | शिबुकुट्टन कुन्नेकाटू पोडीयन, विध्यामोल जी. | विकास पांडुरंग गुंड, हर्षला विकास गुंड |
| ९ | १६ | फा.प्लॉट क्र.४४८,४४९/२, सदनिका क्र.१०४, रिव्हरसाईट पार्क, मोराज के.एल. टाईप सोसा, तक्का, पनवेल | कै. सखाराम सिताराम कदम तर्फे कायदेशीर वारस सुषमा सखाराम कदम, संमती देणारा कै. सखाराम सिताराम कदम तर्फे कायदेशीर वारस प्रविण सखाराम कदम, सुवर्णा सचिन सुर्वे | योगेश अनंत पाटील, अनंत लक्ष्मण पाटील |
| १० | ९ | फा.प्लॉट क्र. ४५८, सदनिका क्र. ए-२१, कल्पतरू रिव्हरसाईड, तक्का पनवेल | मे. कल्पतरू शरीयन्स | पंकज कुमार |
| ११ | * | घर क्र. २०, वळवली, पनवेल | कृष्णा आंधळ्या भोईर | मारुती कृष्णा भोईर ज्वालेश कृष्णा भोईर |
| १२ | * | घर क्र. ३७१/अ, टेंभोडे, पनवेल | नामदेव सदाशिव पाटील | सुरज अशोक गायकवाड |
| १३ | * | घर क्र. ३७१/ब, टेंभोडे, पनवेल | मनोहर सदाशिव पाटील | सुरज अशोक गायकवाड |
| १४ | * | घर क्र. ३२५, टेंभोडे, पनवेल | महेश विनायक पाटील | नलिनी अशोक नाईक |
| १५ | * | घर क्र. ४७५ अ, कामोठे | निलेश अनंत पाटील | फशीबाई अनंत पाटील |
| १६ | * | घर क्र. १४९२, कामोठे | अनंता हरिभाऊ गायकर | रेवताबाई अनंता गायकर, लक्ष्मी संतोष भोपी |
| १७ | * | घर क्र. १५६८ पैकी ६ | महमद आरिफ एफ. कुरेशी | खमलूलू खान वाइफ ऑफ मादार खान |
| १८ | * | घर क्र. ३५२, कोयनावेळे | मनिषा मधुकर कदम | मकरंद मधुकर कदम |
| १९ | * | प्लॉट/घर क्र. ०/१३, तोंडरे | श्रीनाथजी स्टील यार्ड प्रा.लि. | गुणवंतराय विठ्ठलदास मशरू |
| २० | * | प्लॉट/घर क्र. ०/१२, तोंडरे | श्रीनाथजी स्टील यार्ड प्रा.लि. | गुणवंतराय विठ्ठलदास मशरू |
| २१ | * | घर क्र. ३८७/३०३, तोंडरे | निरज शिवशंकर सिंह | अलोककुमार बिश्वानाथ सिंग |
| २२ | * | घर क्र. ३२/११, तोंडरे | उदय शंकर लोटलीकर | मोहम्मद खलिद जमील खान |
| २३ | * | घर क्र. ३६५, तोंडरे | कृष्णा चांगो पाटील | गुरूनाथ चांगो पाटील, बाबुराव चांगो पाटील |
| २४ | * | प्लॉट क्र.थ- १२८(B), तोंडरे | हायग्रो ऑरगॅनिक फर्टिलायझर्स | मे.शहादत सुलेमान जनबी करीम अॅन्ड कंपनी तर्फे भागीदार शहनाझ ए.एम. शेख |
| २५ | * | प्लॉट क्र.G३/४, नावडे | बुशरा फुडस् प्रा.लि. | मे. जे.के.एच एक्सपोर्टस |

वरील बाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पनवेल महानगरपालिका कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिध्दीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत महानगरपालिकेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमुद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १६ ते २० नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(वंदना गुळवे)**
**सहा. आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**



पृष्ठ क्र.१ वरुन...

## पनवेल शहर पोलीस ठाण्यात महिला राज

दिवसासाठी जबाबदारी देण्यात आली. यावेळी चौधरी यांनी एफआयआर नोंद करुन घेणे, गुन्ह्याची कलमे दाखल करणे, ठाण्यातील नोंद होणारा प्रत्येक गुन्हा त्यांच्या स्वाक्षरीनिशी नोंद करुन घेत त्याला कायदेशीर स्वरुप प्राप्त करुन देण्यात आले आहे.

## खालापूर पंचायत समितीची इमारत दुरून डोंगर साजरे

खालापूरकर विचारत आहेत.

दरम्यान, पंचायत समिती खालापूर प्रशासकीय इमारतीचा भुमीपूजन सोहळा जलसंपदा मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री सुनील तटकरे यांच्या हस्ते व राजिप अध्यक्ष सुभाष प्रभाकर तथा पंडीतशेठ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दि. २५ मार्च २०११ रोजी सायंकाळी ५ वाजता संपन्न झाला होता. तसेच इमारतीचे उद्घाटन दि. ३० जुलै २०१६ रोजी सकाळी ११ वाजता ग्रामविकास, महिला व बाल विभाग, रोहयो मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते व गृहनिर्माण व कामगार मंत्री प्रकाश मेहता यांच्या अध्यक्षतेखाली तसेच ग्रामविकास राज्यमंत्री दादाजी भुसे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. पण २०१६ मध्ये कामकाज सुरू झालेल्या पंचायत समिती इमारतीने २०२२ येईपर्यंत दम तोडला असल्याचे दिसून येत आहे.

## स्फोटके नष्ट करताना स्फोट, तीन पोलीस कर्मचारी गंभीर जखमी

तर एक पोलिस कर्मचारी किरकोळ जखमी झाला या स्फोटामुळे परिसरातील कांबळे तर्फे महाड आकले भोराव आदि गावा मध्ये मोठे दनके बसले. या धक्क्याने गावातील घरेदेखील हादरली असल्याचे स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले. आवाज होताच गावातील नागरिक घाबरून घराबाहेर पडले.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिस अधिकारी, प्रांताधिकारी प्रतिमा पुडलवाड, तहसीलदार सुरेश काशीद आदींनी ग्रामीण रुग्णालयात धाव घेतली. सदर घटना घडत असताना सुरक्षेचे उपाय योजना केली होती अगर नाही याबाबत स्थानिक नागरिकांनी देखील प्रश्नचिन्ह उपस्थित केला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## आ.अनिकेत तटकरे यांच्या हस्ते खारगाव ग्रा.पं.हद्दीत विकासकामांचे भूमीपूजन व उद्घाटन सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहे तालुक्यातील खारगाव ग्रा.पं.हद्दीतील उसर, उसर ठाकूरवाडी, केळदवाडी आदी गावातील विविध विकास कामांचे भूमीपूजन व उद्घाटन सोहळा विधान परिषदेचे आ.अनिकेत तटकरे यांच्या हस्ते ता.६ रोजी मोठ्या उत्साहात व मोठ्या दिमाखदार वातावरणात संपन्न करण्यात आले.

कोकणचे भाग्यविधाते खा.सुनील तटकरे यांच्या क्रुपाशिर्वादाने व पालकमंत्री ना.आदिती तटकरे यांच्या प्रत्यत्नातून आ.अनिकेत तटकरे यांच्या हस्ते सदर विविध विकासकामांचे उद्घाटन व भूमीपूजन सोहळा संपन्न करण्यात आला. यावेळी रा.जि.राष्ट्रवादी काँग्रेस कार्याध्यक्ष मधुकर पाटील, वरसे ग्रा. पं.सरपंच नरेश पाटील, माजी सरपंच रामचंद्र म्हात्रे, तालुका युवक अध्यक्ष जयवंत मुंढे, खारगाव उपसरपंच नितीन मालुसरे, युवा नेते किरण मोरे, मयूर खैरे, उमेश सावंत, नवनीत डोलकर, उत्तम नाईक, तानाजी देशमुख, गौरव सुर्व, श्याम येसपाटील, माजी सरपंच प्रफुल्ल वालेकर, रोहा–मुरूड क्षत्रिय मराठा समाज अध्यक्ष काशिनाथ सावंत, उसर ग्रामस्थ अध्यक्ष भालचंद्र गावडे, ठाकूरवाडी अध्यक्ष यशवंत वारगुडे, फणसवाडी अध्यक्ष यशवंत शिद, पांडुरंग मातेरे, हरि लेंडी, मंगेश गावडे, सचिन सावंत, राजेश गावडे, शांताराम गावडे, वसंत खामकर, लक्ष्मण सुतक, सदस्य प्रकाश ढुमणे, बबन वारगुडे आदी मान्यवर उपस्थित होते.याच कार्यक्रमात खा.सुनील तटकरे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेऊन येथील अन्य पक्षातील मोठ्या संख्येने कार्यकर्ते मंडळींनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहिर प्रवेश करून हातात राष्ट्रवादी काँग्रेसचे घड्याळ बांधले.

याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना आ.अनिकेत तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा एखाद्याचा पक्ष न बघता माणसाच्या समस्या शोधून त्यावर मार्ग काढून काम करणारा पक्ष असल्याने रोहे तालुक्यासह रायगड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद दिवसेंदिवस वाढत चालली असल्याचे दिसून येत आहे.तर आपल्या गावाचा विकास व एकतेसाठी सर्वांनी एकत्र या विकासकामासाठी लागणारा निधी कमी पडू दिला जाणार नाही असे शेवटी त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक युवा नेते उमेश सावंत यांनी केले. तर नंदकुमार मरवडे यांनी सुत्रसंचलन व आभार व्यक्त केले.



## वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

## महिलांचा सन्मान करावा : सादूराम बांगारे

**दै.रायगड नगरी । खांब**

जागतिक महिला दिवसालाच नव्हे तर रोजच महिलांचा सन्मान करावा अशाप्रकारचे भावनाप्रधान विधान रोहे पं.समितीचे गट शिक्षण अधिकारी सादूराम बांगारे यांनी जागतिक महिला दिनाचे कार्यक्रम प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना केले.

नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेचे श्रमिक विद्यालय चिल्हे येथे आयोजित करण्यात आलेल्या जागतिक महिला दिनाचे कार्यक्रम प्रसगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

या कार्यक्रमप्रसंगी सर्वप्रथम माँसाहेब जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्रीबाई फूले यांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यालयातील महिला कर्मचारी वर्गाचा यथोचित सन्मान करण्यात आला.

तसेच विद्यार्थी वर्गानेही आपापले मनोगत व्यक्त करून या दिवसाचे महत्त्व सांगितले.

## मुलींबरोबर मुलेही सातच्या आत घरात आली तर अनेक अतिप्रसंग टळतील : ॲड. तृप्ती पाटील



**दै.रायगड नगरी । कर्जत**

'सगळीकडेच मुलींवर जास्त बंधने असतात. मुली सातच्या आत घरात आल्या पाहीजेत. असे अनेक पालकांना वाटते मात्र मुले रात्री अपरात्री घरी आली तरी पालकांना चालतात आणि त्यामुळेच विचित्र घटना घडतात. अनेक पालकांचा आपल्या तरुण मुलांवर फाजील विश्वास असतो. त्याचा फायदा ही मुले घेतात आणि मित्रांच्या संगतीने व्यसनी होऊन नाही तो प्रकार घडतो. मुलींबरोबर मुलेही सातच्या आत घरात आली तर अनेक अतिप्रसंग टळतील.' असा विश्वास ॲड. तृप्ती पाटील यांनी येथे व्यक्त केला.

कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने सेमिनार हॉल मध्ये जागतिक महिला दिनाचे आयोजन केले होते. ॲड.तृप्ती पाटील यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, अर्चना काळे, प्रा. पूनम पाटील, प्रा. ज्योती लहाने आदी व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. काळे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात 'मुलांनी मुलींशी सन्मानाने वागावे. त्यांना नेहमी सहकार्य करावे.' असे सूचित केले.

ॲड. पाटील पुढे म्हणाल्या,'एखादा मुलगा पहिल्यांदा एखाद्या मुलीला धक्का मारतो. त्यावेळीच त्याला रोखले पाहिजे अन्यथा पुढे विचित्र घटना घडू शकतात. मात्र मुली भीतीने काहीच करीत नाहीत त्यामुळे अशा मुलांची हिम्मत वाढते आणि मग अगदी आत्महत्येपर्यंत प्रकरण जाऊ शकते. त्यामुळे मुलींनी पहिल्यांदाच असे कुणी वागले तर लगेचच त्याला ठणकावले पाहिजे. महत्वाची बाब म्हणजे आपल्या कुटुंबात येणाऱ्या आपल्या नातलगाशी सुद्धा आपण सावधतेने वागले पाहिजे. नाहीतर कधी तरी बाक्या प्रसंगाला तोंड देण्याची पाळी आपल्यावर येऊ शकते.' असा महत्वपूर्ण सल्ला दिला. त्यांनी लहान मुलांवर तसेच मुलींवर होणाऱ्या अत्याचाराबद्दलच्या कायद्यांची सविस्तर माहिती दिली. विजय मांडे यांनी आपल्या मनोगतात, 'केवळ ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन असल्याने एकच दिवस महिलांशी सौजन्याने न वागता त्यांचा कायम आदर करणे गरजेचे आहे. केवळ शिवजयंतीच्या दिवशी आपल्या अंगात वेगळा जोश येतो तसे न करता छत्रपती शिवाजी महाराजांची विचारधारा अंगिकारली पाहिजे.' असे स्पष्ट केले. सूत्रसंचालन प्रा. तनिष्का ठाकरे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. ज्योती लहाने यांनी केले. याप्रसंगी विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## आदिवासी महिलांच्या आरोग्याविषयी जागृतीसाठी विशेष कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

८ मार्च रोजी दरवर्षी महिला दिन साजरा केला जातो. माणगांव पोलिस ठाण्यात आज पोलिस ठाण्याचा संपूर्ण चार्ज पोलिस उपनिरीक्षक अस्मिता पाटील यांच्या नेतृत्वाखाली महिला कर्मचाऱ्यांकडे देत त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच आदिवासी महिलांमध्ये आरोग्या विषयी जागृतीसाठी स्त्री रोग तज्ञ डॉ. श्रुती केतन निकम यांचे मार्गशनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी डॉ. श्रुती यांनी बालविवाह करू नका असा संदेश देत. स्त्रियांच्या आरोग्या विषयी चर्चा करत मासिक पाळीच्या वेळी कोणती काळजी घ्यायची, पौष्टिक अन्न कोणत असत, मशेरीचे व्यसन कसे कॅन्सर साठी कारणीभूत ठरते अशा विविध विषयांची माहिती देत आदिवासी महिलांशी चर्चा केली. पोलिस निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी सगळ्या आदिवासी महिलांशी संवाद साधत त्यांना शिक्षणाचे महत्व सांगितले व तसेच जर सगळ्यांना आपली तपासणी करायची असेल तर आरोग्याविषयी शिबिर लवकरच आपण घेऊ असे सांगितले. यावेळी महिला दक्षता समितीच्या सदस्या स्मिता मिरजकर देखील उपस्थित होत्या. सर्व महिलांना गुलाबाचे फुल आणि सॅनेटरी पॅड देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.





मा.मुजावर साहेब यांचे कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.३५२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०४/२०२२

१) श्री.संदीप विजय कुडलकर
वय : ५८ वर्षे, धंदा : नोकरी
२) कु.किरण संदीप कुडलकर
वय : २४ वर्षे, धंदा : शिक्षण
दोघेही मुळ रा.सी/९, निर्मण विहार,
सीपीडब्ल्यू कॉम्प्लेक्स, बामबुलीम कॉम्प्लेक्स,
उत्तर गोवा, गोवा–४०३२०२
दोघेही सध्या रा.ई/४०५, सत्यकुंज कॉम्प्लेक्स,
सेक्टर–३६, प्लॉट नं.४१ व ४२, कामोठे,
ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार क्र.१ यांची पत्नी म्हणजेच अर्जदार क्र.२ यांची आई स्नेहा संदीप कुडलकर या दि.०६/०५/२०२१ रोजी मौजे : कामोठे, ता.पनवेल येथे मयत झाले आहेत. सदर मयत स्नेहा संदीप कुडलकर यांनी त्यांच्या हयातीत अर्जदार क्र.१ यांचेसोबत खालीलप्रमाणे वर्णन केलेली सदनिका दि.०८/०८/२०१९ रोजीच्या सेल डिड या दस्ताने १) श्री.राहूल धनाजी मोरे व २) श्री.धनाजी कुंडलिक मोरे यांच्याकडून खरेदी केलेली असून सदरचा दस्त पनवेल येथील मे.दुय्यम निबंधक यांचे कार्यालयात दस्त क्र.पवल–३/१२६०४/२०१९ अन्वये दि.०८/०८/२०१९ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. सदर सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मौजे : कामोठे, ता.पनवेल येथील सेक्टर–३६, मधील प्लॉट नं.४१ व ४२, वरील सत्यकुंज कॉम्प्लेक्स या इमारतीमधील ई विंग मधील सदनिका क्र.४०५, क्षेत्र–४८.०१ चौ.मी. ही सदनिका**

आता वर नमूद केलेली सदनिका मयत स्नेहा संदीप कुडलकर यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून सदर अर्जदारांचे नावे होण्याकरिता त्यांनी संबंधित कार्यालयात चौकशी केली असता त्यांस सक्षम कोर्टातून मयत स्नेहा संदीप कुडलकर यांचा वारस दाखला आणण्याकरिता सांगितले. सबब सदर अर्जदारांनी ते मयत स्नेहा संदीप कुडलकर यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.८ मार्च माहे सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.मुजावर साहेब कोर्ट

ॲड.एस.के.राणे, पनवेल
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१२२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०३/२०२२

कै.सुभाष गणपत गायकवाड मयत तर्फे वारस
१) श्रीमती.सुनिता सुभाष गायकवाड
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
१०२ डी, आदित्य अपार्टमेंट, वाकोळा पाईप
लाईन, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई–४०००५५
२) श्री.सुशांत सुभाष गायकवाड
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.१०२, डी विंग, आदित्य अपार्टमेंट, सिद्धार्थनगर
वाकोला पाईपलाईन, सांताक्रुझ पुर्व, मुंबई–४०००५५
३) श्री.राकेश सुभाष गायकवाड
वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.जी–८४, आंबेडकर नगर, हंसबुरहाग,
विद्यानगरी मार्ग, अग्नीशमन दलाच्या बाजूला,
सांताक्रुझ पुर्व, मुंबई–४०००९८ — अर्जदार

कै.सुभाष गणपत गायकवाड हे मुंबई येथे दि.०२/११/२०११ रोजी मयत झाले असून त्यांची आई कै.लक्ष्मीबाई गणपत गायकवाड ह्या मुंबई येथेच राहत्या घरी सन १९६७–६८ साली मयत झालेली असून त्यांच्या मयताची नोंद महानगरपालिकेमध्ये झालेली नाही. श्रीमती.सुनिता सुभाष गायकवाड वगैरे ह्यांनी कै.सुभाष गणपत गायकवाड यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**परिगंधा को.ऑ.हौ.सो.,**
**रुम नं.१६, चौथा मजला, क्षेत्र ७३० चौ.फूट**
**महात्मा फुले रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**एकूण रक्कम रु.२,९०,०००/–**
**(अक्षरी रक्कम रुपये दोन लाख नव्वद हजार मात्र)**

वर उल्लेखलेली मिळकत कै.सुभाष गणपत गायकवाड यांचे नावे असल्याने सोसायटीच्या व महानगरपालिकेच्या दप्तरी मालक म्हणून त्यांचेच नाव आज रोजी पर्यंत आहे. श्रीमती.सुनिता सुभाष गायकवाड वगैरे हे कै. सुभाष गणपत गायकवाड यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.सुनिता सुभाष गायकवाड वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.सुभाष गणपत गायकवाड यांच्या वाारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.८/३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## बोर्ली-मांडला प्राथमिक आरोग्य केंद्रात महिलादिनी आरोग्य विषयक मार्गदर्शनपर शिबिर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुका आरोग्य विभागाचे क्षयरोग नियंत्रण पथक व बोर्ली–मांडला प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य केंद्रात कोविड –१९ लसीकरणासाठी उपस्थित महिलांना क्षयरोग विषयक मार्गदर्शनपर माहिती देण्यात येऊन जनजागृती करण्यात आली.

यावेळी वरीष्ठ औषधोपचार पर्यवेक्षक संकेत घरत यांनी उपस्थित महिलांना टी.बी.(क्षय) रोग म्हणजे काय?त्याची लक्षणे,कारणे व त्यावर औषधोपचार उपायांबाबत माहिती दिली.क्षयरोग हा पुर्णपणे बरा होतो.

त्यामुळे रुग्णांनी घाबरून न जाता या रोगाची लक्षणे दिसताच तात्काळ नजीकच्या शासकीय रुग्णालयात जाऊन थुंकी नमुना देऊन, एक्सरे काढून रोगनिदान करुन घ्यावे व योग्य औषधोपचार घेऊन रोगमुक्त व्हावे.असे सांगीतले. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.राजश्री जगताप, आरोग्य सहाय्यक गणेश भोबू, अनिकेत हजारे यावेळी उपस्थित होते.

# पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जि.रायगड – पिन नं.४१० २०६**

**कार्यालय : २७४५८०४०/४१/४२** **फॅक्स नं.: ०२२–२७४५२२३३**
**Email : panvelcorporation@gmail.com**

**कार्यालय जा.क्र.पमपा/कर/हस्तां/२२२१/९३५/२०२२ दिनांक : ०४/०३/२०२२**

**वाचा :– महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १ ते ४**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पनवेल महानगरपालिकेकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

| अ. क्र. | भाग क्र. | स.नं./प्रॉ.नं./फा.प्लॉट नं. सदनिका/गाळा क्र. | जुने नाव | नविन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | * | घर क्र. २६५, कोपरा | कासुबाई जोमा ठाकुर | हनुमान जोमा ठाकुर व सुतोष जोमा ठाकुर |
| २ | * | घर क्र. २९३–ड, कोपरा | कासुबाई जोमा ठाकुर | हनुमान जोमा ठाकुर व सुतोष जोमा ठाकुर |
| ३ | * | घर क्र. ६०५, रूम नं. १०४, कोपरा | भक्ती डेव्हलोपर्स | शामबहादुर रूपनारायण पटेल व निर्मला शामबहादुर पटेल |
| ४ | * | घर क्र. ६०५ रूम नं. ३०७, कोपरा | भक्ती डेव्हलोपर्स | मिलींद विश्वास पाटील |
| ५ | * | घर क्र. १०९१–ढ, तळोजा पाचनंद | सबिहुद्दीन मोहम्मद अली | मोहम्मद आरिफ अब्दुलहई खान |
| ६ | ६ | सिटी एस क्र.६०५/१ब, शॉप क्र.०४, मानसरोवर सोसा, पनवेल | उषा माणकेश्वर कायकरर्ते यांच्या तर्फे कु.मु. म्हणून शामसुंदर माणकेश्वर, महेबुब गैबी पटेल | रामकुष्ण बंडू भगत |
| ७ | १४ | सर्व्हे क्र.४८३,४८४, सदनिका क्र. ५०२, साई राज पॅराडाईज, पनवेल | मे. सुपर कंन्स्ट्रक्शन, अब्दुला शेहजादअली शेख, रईसा अब्दुला शेख | सलीम रमजान महालदार, मिस शमशाद सुल्तान घोरी उर्फ मिसेस शमशाद सलीम महालदार |
| ८ | १४ | प्लॉट क्र. २९/६,५२३, सदनिका क्र. ४०४, सुशील गार्डन, पनवेल | रामकृष्ण गजानन लाड, रंजना रामकृष्ण लाड | रामकृष्ण गजानन लाड, नितीन रामकृष्ण लाड |
| ९ | * | ४७२ गाळा क्र. १३, असुडगाव | श्रीकारा सागर फ्राईट सर्विसेस | सेफ शिपींग सर्विस तर्फे प्रोप्रायटर श्री.के. तिरूमलई |
| १० | * | १३६(२०३), असुडगाव | संतोष ज्ञानेश्वर घूमटकर | पूर्णिमा अशोक कांबळे, अशोक निवृत्ती कांबळे |
| ११ | * | घर क्र. ४९३, रोडपाली | किशोर धर्मा कडके | छाया नरेश कोळी |
| १२ | १५ | प्लॉट क्र. २४७, गाळा नं. ३७, पनवेल महानगरपालिका शॉपिंग सेंटर, पनवेल | कुसुमबाई मच्छिंद्र झगडे | श्वेता महेश कर्णिक |
| १३ | १६ | फा.प्लॉट क्र.४४८, सदनिका क्र.३०३, मोराज रिव्हरसाईड पार्क, तक्का, पनवेल | विद्याधर मुरारी नार्वेकर | सुरेश बापु कुंभार, मंगल सुरेश कुंभार |
| १४ | १३ | फा.प्लॉट क्र.४३७, सदनिका क्र.४०, लिलॅक बिल्डींग, गोदरेज स्काय गार्डन, पनवेल | क्षुदीराम अनिल मुखेपाध्याय | श्रध्दा सचिन आवटे |
| १५ | ६ | सिटी एस क्र.६३२,६३३,६३३/१, गाळा क्र.८, यशोमंगल सोसा, पनवेल | मे. केदार इंटरप्रायझेस | पियुष धीरजलाल दोशी, सोनल पियुष दोशी |
| १६ | ६ | सिटी एस क्र.६३२,६३३,६३३/१, गाळा क्र.९, यशोमंगल सोसा, पनवेल | मे. केदार इंटरप्रायझेस | पियुष धीरजलाल दोशी, सोनल पियुष दोशी |
| १७ | ६ | सिटी एस क्र. ६३२,६३३,६३३/१, ऑफीस क्र. १९, यशोमंगल सोसा, पनवेल | मे. केदार इंटरप्रायझेस | पियुष धीरजलाल दोशी, सोनल पियुष दोशी |
| १८ | OP-९९ | सिटी एस क्र.१२५८/१बी, सदनिका क्र.ए–२०१, हाथीमा हॉम्स, पनवेल | मे. प्रॉस्पेरीटी डेव्हलपर्स | रमेश वासुदेव साष्टे, रिना रमेश साष्टे, सनी रमेश साष्टे |
| १९ | OP-९९ | सर्व्हे क्र.४७९ए/१, सदनिका क्र.४०२, रेखी रेसिडेन्सी, पनवेल | उषा श्यामसुंदर चंडोक | रमेश आत्माराम पाटील |
| २० | ११ | फा.प्लॉट क्र.७६/२, सदनिका क्र.६, जयमाता सोसा, पनवेल | सचिन कुलकर्णी | भाग्यश्री सचिन कुलकर्णी |
| २१ | ९ | फा.प्लॉट क्र.२१३–ए, २१२, ऑफिस क्र.२६, गार्डन व्हयु. पनवेल | जयंत अर्जुन भोईर | किरण पांडुरंग जगनाडे, स्वाती किरण जगनाडे |
| २२ | ११ | फा.प्लॉट क्र.८९, सदनिका क्र. १०, गितांजली सी एच एस, पनवेल | श्रवणकुमार हरिशचंद्र जाधव | करूणा श्रवणकुमार जाधव, जान्हवी जाधव उर्फ सौ. जान्हवी सायरस पेस्सो विलास सदू भोपी |
| २३ | १२ | फा.प्लॉट क्र.१२५–ए, ऑफिस क्र.सी–१०३, नंदनवन कॉम्प्लेक्स, पनवेल | रेखा कन्हैयालाल शारदा, कन्हैयालाल गोविंदास शारदा | विलास सदू भोपी |
| २४ | १० | सिटीएस क्र.१३२३ व इतर, डी–३१, यशोवर्धन सोसा, पनवेल | मनिषा प्रदिप घांग्रेकर, प्रदिप बाळकृष्ण घांग्रेकर | नरेंद्र वसंत काळे, स्नेहा नरेंद्र काळे |
| २५ | १० | सिटीएस क्र. १३२३ व इतर, डी–३२, यशोवर्धन सोसा, पनवेल | प्रदिप बाळकृष्ण घांग्रेकर, मनिषा प्रदिप घांग्रेकर | नरेंद्र वसंत काळे, स्नेहा नरेंद्र काळे |

वरील बाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पनवेल महानगरपालिका कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिध्दीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत महानगरपालिकेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमुद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १६ ते २० नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/–**
**(वंदना गुळवे)**
**सहा. आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

# संक्षिप्त...

## उकाडा जाणवू लागेल्यामुळे कलिंगड, शितपेय, ज्युस यांना वाढती मागणी

**दै.रायगड नगरी । कोलाड**

मार्च महिना सुरु होताच खऱ्या अर्थाने हळूहळू उन्हाळा जाणवू लागला असून निरभ्र आकाश आणि कोरडा वातावरण यामुळे गर्मी जाणवू लागल्यामुळे यापासून शरीराचा दाह कमी करण्यासाठी नागरिक कलिंगड, शितपेय,ज्युस यांना पहिली पसंती देत असून यामुळे यांची मागणी वाढली आहे.

दररोज लावण्यात येणारे वणवे, वाढते प्रदूषण व सततचा होणाऱ्या पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे राने वने ओस पडू लागली असून रोहा तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात दिवसेंदिवस उष्णतेचे प्रमाण वाढत आहे. या वाढत्या तापमाणामुळे नागरिक पूर्णपणे हैराण होत आहेत यामुळे शरीराला गारवा मिळवण्यासाठी कलिंगड, ज्युस, शितपेय याकडे लोकांचा कल वाढतांना दिसत आहे.

मार्च महिन्याच्या सुरुवातीला आताच उन्हाचा पारा ३८ अंशापेक्षा वर गेला असल्यामुळे सकाळी दहा वाजल्यापासून उन्हाचे चटके बसत असून अशा परिस्थितीपासून बचाव करण्यासाठी कलिंगड, लिंबू सरबत, ऊसाचा रस, लस्सी, नागरिक याचा आधार घेतांना दिसत आहेत.

## एकनाथ देशमुख यांच्या कडून राजिप पुगाव शाळेला आर्थिक मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रोहा तालुक्यातील पुगाव गावचे सुपुत्र उच्च शिक्षित तसेच शैक्षणिक आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारे सेवा निवृत्त पोलीस अधिकारी एकनाथ पांडुरंग देशमुख यांनी आपल्या गावातील प्राथमिक शाळेला ५००० रुपयांची आर्थिक मदतीचा हात करत अधिक नामांकित कंपनीचे तीन सिलिंग फॅन भेट देण्याचे जाहीर केले आहे त्यामुळे येथील शालेय शिक्षक व विद्यार्थी वर्गात शिक्षणाचा अधिक दर्जा उंचावेल असे मोलाचे योगदान दिले आहे .

एकनाथ पांडुरंग देशमुख यांचं प्राथमिक शिक्षण सुरवातीला याच शाळेत झाले होते परंतु शाळेतील एक आठवणीतील दिवस म्हणून ही भावना उराशी बाळगून ते पोलीस नोकरीच्या उच्च पदावरून सेवा निवृत्त होताच त्यांनी एक हात मदतीचा शैक्षणीक व सामाजिक सेवा म्हणून या शाळेस येथील विद्यार्थ्यांना स्काऊड गाईड व मुलांना लेझीम पथकासाठी रुपये ५००० रक्कम आर्थिक साहाय्यता मदत शाळेचे मुख्याध्यापक निवास थळे, यांना स्वईच्छने सुपूर्द करणतात आली यावेळी सहाय्यक शिक्षक प्रसाद साळवी,ग्राम पंचायत सदस्य गणेश म्हसकर सह आदी विद्यार्थी वर्ग यावेळी उपस्थित होते.

### श्रीवर्धन तालुक्यात महिला दिवस उत्साहात साजरा

# महिलांसाठीच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविणार : अमित शेडगे

**दै.रायगड नगरी । दिघी**

कोरोना महामारीच्या कालावधीमध्ये अनेक कुटुंबातील कर्ता व्यक्ती कुटुंबापासून दुरावला आहे. कोरोना कालावधीमध्ये कोरोनाने बाधित होऊन मयत झालेल्या कुटुंबांना आधार देण्यासाठी शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सदैव तयार आहे. प्रशासकीय योजनांच्या माध्यमातून स्त्री सक्षमीकरण यासाठी प्रशासकीय यंत्रणा सदैव सज्ज आहे. असे प्रतिपादन श्रीवर्धन चे प्रांताधिकारी अमित शेडगे यांनी केले आहे. जागतिक महिला दिनाचं औचित्य साधत श्रीवर्धन प्रांताधिकारी कार्यालयाच्या सभागृहात मध्ये अमित शेडगे यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधला आहे.



शेडगे म्हणाले महिला सबलीकरणासाठी शासनाने विविध योजना सुरु केल्या आहेत. योजनाचा लाभ तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा तत्पर आहे. कोरोनाने मयत झालेल्या कुटुंबांना आर्थिक मदत सरकारकडून दिली जात आहे. प्रत्येक लाभार्थ्यांना मदत पोहोचविणे प्रशासकीय यंत्रणेचे दायित्व आहे. आपण कुणालाही कोणत्याही स्वरूपाची अडचण असेल तर त्यांनी तात्काळ श्रीवर्धन तहसीलदार कार्यालयाशी संपर्क साधावा. संजय गांधी योजना त्यासोबत इतर महिलांसाठी असलेल्या प्रत्येक योजनेचा पात्र महिलांनी लाभ घ्यावा असे अमित शेडगे यांनी सांगितले आहे. सदर कार्यक्रमासाठी श्रीवर्धनचे तहसीलदार सचिन गोसावी, महिला व बाल विकास विभागाच्या स्थानिक पदाधिकारी आणि तालुक्यातील विविध महिला उपस्थित होत्या.

श्रीवर्धन मधील गोखले कॉलेजमध्ये उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत स्वामी यांनी उपस्थित सर्व महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. गोखले एज्युकेशन चे प्राचार्य श्रीनिवास जोशी शहरातील महिला समितीच्या विविध पदाधिकारी सदर प्रसंगी उपस्थित होत्या. श्रीवर्धन पोलीस ठाण्यातील महिला कर्मचारी शहरातील विविध महिला नी मोटरसायकल वरून श्रीवर्धन शिवाजी चौक ते गोखले कॉलेज प्रभात फेरी काढली. फेटा बांधून पारंपरिक वेष परिधान करून महिलांनी दुचाकीवरून काढलेल्या फेरीचे सर्वांनीच कौतुक केले आहे. श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर, हवालदार राजेंद्र पेडवी तसेच इतर पोलिस कर्मचारी सदर प्रसंगी उपस्थित होते.

एस एन डी टी महाविद्यालयात विद्यार्थिनींच्या आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. डॉक्टर चित्रा ढवळे यांनी उपस्थित सर्व विद्यार्थिनींना आरोग्य आणि महिला या विषयी संबोधित केले. एस एन डी टी महाविद्यालयाचे समन्वयक अनिल वाणी व इतर शिक्षक कर्मचारी आणि विद्यार्थिनी सदर कार्यक्रम प्रसंगी उपस्थित होते.

## सिटी बेल वृत्तसमुहाने केला ग्रंथसेवा देणाऱ्या महिलांचा सत्कार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वाचन संस्कृतीचे जतन करण्यासाठी, किंबहुना तिचे संवर्धन करण्यासाठी ज्या महिला कर्मचारी झटत आहेत त्यांचा सिटी बेल आणि सोसायटी किंग्डम यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाच्या औचित्याने सत्कार करण्यात आला. पनवेल नगरीतील ऐतिहासिक के गो लिमये वाचनालयाच्या ग्रंथपाल निकिता महेश शिंदे यांचा व त्यांच्या महिला सहकाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.



सिटी बेल वृत्त समूहाचे समूह संपादक मंदार दोंदे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. अस्तंगत पावत असलेल्या वाचन संस्कृतीचे संवर्धन ही काळाची गरज आहे. कितीही आधुनिक तंत्र प्रगत शास्त्र आली तरीदेखील पुस्तकवाचन माध्यमातून ज्ञानार्जन करणे हा प्रकार कालबाह्य होणार नाही. के गो लिमये वाचनालयाच्या माध्यमातून ग्रंथ सेवा देत असलेल्या महिलांचा आम्हाला निश्चितच अभिमान आहे असे ते म्हणाले. ग्रंथालयाच्या अध्यक्षा सुनीता जोशी यांनी सिटी बेल आणि सोसायटी किंगडम संस्था करत असलेल्या या उपक्रमाची प्रशंसा केली. वाचन संस्कृती संवर्धन करता सेवाभावी संस्थांनी अशा प्रकारे पुढे आल्यास त्याचे निश्चित स्वागत होईल असे त्या आपल्या मनोगतात म्हणाल्या. सचिव काशिनाथ जाधव यांनी सिटी बेलचे समूह संपादक मंदार दोंदे आणि समूह संपादक विवेक पाटील तसेच सोसायटी किंग्डमचे संस्थापक अध्यक्ष वैभव सोनटक्के यांचे या उपक्रमाबद्दल आभार मानले.

ग्रंथ सेवा देणाऱ्या महिलांच्या सत्कार समारंभाला ग्रंथालयाच्या अध्यक्ष सुनीता जोशी, कार्याध्यक्ष श्री वत्सराज, सचिव काशिनाथ जाधव, सिटी बेलचे समूह संपादक मंदार दोंदे, समूह संपादक विवेक पाटील, ग्रंथपाल निकिता महेश शिंदे, राधिका सुनील साठे, संजय दिवटे आदी मान्यवर उपस्थित होते.

## कचेरी रोडवरील बहुचर्चित खड्डा नगराध्यक्षांचे कार्य तत्परतेने दूर झाला

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

खितपत पडलेला कचेरी रोड वरील तलाठी भवन शेजारील बालोद्यान जवळील मुख्य रस्त्यावरील धोकादायक खड्डा मध्यंतरीचा काळ हा नगर पंचायत निवडणुक व कोरोना सारखे संकट यामुळे एक वर्षा-हुनही अधिकचा काळ दुर्लक्षित होता. रस्त्यावरील या खड्ड्या मुळे नागरिकांना होत असलेल्या व वाहतुकीला होणाऱ्या त्रासा बाबत आपल्या वर्तमान पत्रातुन आवाज उठविला होता. याची कोणीही दखल घेतली नव्हती, अनेक प्रशासनाचे अधिकारी लोकप्रतिनीधी व समस्त माणगांवकर याच रस्त्यावरुन ये-जा करीत होते. खड्ड्यामुळे होणाऱ्या त्रासा मुळे लोक पुढाऱ्यांना दोष देत होते.

मात्र माणगांवचे माजी उपसरपंच अनंता थळकर यांचे पुढाकाराने स्थानिक जेष्ठ पत्रकार व सुज्ञ नागरिक अशा तिघांनी सेवा निवृत्त तहसिलदार शिवाजी जाधव यांचे सल्लयानुसार श्रमदान करीत स्वयंस्फूर्तिने हा खड्डा तात्पूरता का होईना भरला होता. त्यावेळी माणगावकरांना हायसे वाटले होते. या गोष्टीची दखल घेत शिवसेना नेते ॲड. राजीव साबळे तसेच माणगांव नगरीचे नवनिर्वाचीत नगराध्यक्ष ज्ञानदेव पोवार व उपनगराध्यक्ष सचिन बोंबले यांनी त्यांची नगर पंचायतवर सत्ता येताच तत्परतेने याची दखल घेतो असा शब्द दिला होता.

अखेर रविवार दि. ६ मार्चला हा खड्डा भरण्याचे योग्य काम झाले आहे. त्यामुळे ड. राजीव साबळे यांनी दिलेला शब्द पाळला आहे. नगराध्यक्ष ज्ञानदेव पोवार यांची कार्य-तत्परता यामुळे रस्त्यावरील अडथळा दूर झाला आहे. त्यामुळे माणगांव-करांनी समाधान व्यक्त केले आहे.



# कर्जतमध्ये आशा वर्कर यांचा सन्मान

**दै.रायगड नगरी । कर्जत**



कोरोना काळात स्वतः चा जीव धोक्यात घालून गोरगरीबांचे जीव वाचावणाऱ्या आशा वर्कर यांचे ३५ रुपये प्रति दिवसाचे मानधन देऊन तरी महिलांचा सम्मान सरकारने करावा तरच महिला दिन साजरा करण्यात अर्थ आहे असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश उपाध्यक्षा चित्रा वाघ यांनी कर्जत मध्ये केले.

भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा कर्जत तालुका आणि नेरळ शहर यांच्यावतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून तालुक्यातील कर्तृत्ववान महिला आणि आशा वर्कर यांचा सम्मान सोहळा नेरळ येथे आयोजित केला होता. महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष चित्रा वाघ यांच्या हस्ते कर्तृत्ववान महिला आणि आशा वर्कर यांचा सम्मान पत्र आणि साडी देऊन सम्मान करण्यात आला. यावेळी चित्रा वाघ यांनी राज्य सरकारला महिलांबाबत काहीतरी वाटत असेल तर त्यांनी आशा वर्कर यांचा कोरोना काळातील ३५ रुपये प्रति दिन भत्ता त्वरित द्यावा तरच महिला दिन साजरा करण्यात अर्थ आहे असे प्रतिपादन केले. परंतु हे निद्रिस्त सरकार महिलांना न्याय देऊ शकत नाही रोज वेगवेगळ्या भागात अल्पवयीन मुली पासून वृद्ध महिलांवर बलात्कार होत आहेत आणि सरकार त्यांच्या बाजूने उभे राहत आहे अश्या सरकारचा निषेध करू तेवढा कमी आहे. भविष्यात होणाऱ्या आरोग्य सेवा भरतीत आशा वर्कर यांना प्राधान्य देऊन त्यांना सामावून घ्यावे त्यासाठी भारतीय जनता पार्टी तुमच्या पाठीशी ठामपणे मागे उभी राहील असे सांगितले. सर्व आशा वर्कर अतिशय आनंदी होत्या आपल्या कामाची दाखल घेऊन आपल्या पाठीवर कौतुकाची थाप कोणीतरी देत आहे ही भावना आशा वर्करच्या प्रमुख यांनी बोलून दाखविली त्यांनी चित्रा वाघ यांचे विशेष आभार मानून आमच्या कामाची दखल घेतल्या बद्दल महिला तालुका अध्यक्ष स्नेहा गोगटे आणि नेरळ महिला अध्यक्ष नम्रता कांदळगावकर यांचे आभार मानले. याप्रसंगी भारतीय जनता पार्टी महिला जिल्हा अध्यक्ष अश्विनी पाटील यांचे सह प्रदेश जिल्हा तालुका महिला पदाधिकारी, नगरसेविका, ग्रामपंचायत सदस्या आणिअनेक महिला कार्यकर्त्यां तसेच पुरुष पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## जागतिक महिला दिन साजरा करताना ऑन ड्युटी चोवीस तास असलेल्या भारतीय महिलांचा आदर्श घ्यावा : शैलेश पालकर

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पूर्वी तालुक्यात फारच तुरळक प्रमाणात महिलादिनाचे आयोजन होत असे. २००९ साली कोकण मराठी साहित्य परिषदेच्या माध्यमातून आपण नारीशक्ती सोहळ्याचे आयोजन केल्यानंतर आता पोलादपूर शहरामध्ये ८ मार्च पासून १० मार्चपर्यंत जागतिक महिला दिन साजरा केला जात आहे. भारताने आठ तासांच्या ड्युटीसाठी संघर्ष करण्याच्या दिवसाचा आदर्श घेण्यापेक्षा ऑन ड्युटी चोवीस तास असलेल्या भारतीय महिलांचा आदर्श जगाने घ्यावा, असे आवाहन ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांनी कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये आयोजित जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमप्रसंगी केले.

यावेळी व्यासपिठावर राजिप सदस्या सुमन कुंभार, निवासी नायब तहसिलदार शरदकुमार आडमुठे, सेवानिवृत्त तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.गुलाबराव सोनावणे, आयुषचे डॉ.राजेश शिंदे, गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे, सहायक गटशिक्षणाधिकारी वृक्षाली यादव, महिला व बालकल्याण प्रकल्पाधिकारी गोविंद धस, शिंदे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

ज्येष्ठ पत्रकार पालकर यांनी, कोरोना मृत पुरूषांची संख्या ४२ तर महिलांची संख्या १२ अशी ५४ जणांना मदत मिळण्याची सरकारी आकडेवारी दिसून आली तरी रूग्णालयात गेल्यावर आणि जाण्यापूर्वी मृत झालेल्यांच्या सर्वच आकडेवारीचा समावेश यामध्ये दिसून येत नाही. कोविड सुरक्षा कवचाच्या वल्गना होत असताना आताचे ५० हजार हे बुडत्याला काडीचा आधार असल्याचे सांगितले. याप्रसंगी डॉ.राजेश शिंदे आणि डॉ.गुलाबराव सोनावणे यांनी महिलांच्या आरोग्यविषयक प्रश्नांसह अंगणवाडी सेविकांनी कोविड काळात केलेल्या कामांचा गौरव करून अंगणवाडी सेविका, आशा सेविका यांच्या स्वतःच्या जीवावर उदार होऊन केलेल्या सेवेला तोड नसल्याचे सांगितले.



## साळाव ते तळेखार विभागातील कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर पक्षप्रवेश

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या कुशल कार्यप्रणालीवर श्रद्धा ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस सय्यद खान यांच्या नेतृत्वाखाली मुरुड तालुका पंचायत समितीच्या माजी सभापती मनीषा सानेकर व साळाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रवि सानेकर यांच्यासह साळाव ते तळेखार विभागातील दिडशे कार्यकर्त्यांनी रोहा-सुतारवाडी येथे झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला.



रवि सानेकर, मनीषा सानेकर यांच्यासह साळाव ते तळेखार विभागातील दिडशे कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला. यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी सर्व प्रवेश कर्त्यांचे स्वागत केले आहे. आगामी काळात होणाऱ्या नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात हालचालींना सुरुवात झाली असल्याचे चित्र दिसून येत असून मुरुड तालुक्यातील साळाव ते तळेखार विभागातील दिडशे कार्यकर्त्यांचा रवि सानेकर मनीषा सानेकर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर पक्षप्रवेशाने आगामी निवडणुकीत निश्चितच परिणाम दिसून येईल. असे बोलले जात आहे.

यावेळी साळाव ग्रामपंचायत उपसरपंच दिनेश बापलेकर, सदस्य मंगेश शेट्टी, राजू वाघमारे, नयन पाटील, अनिल चोरडेकर, हरिश्चंद्र पाटील, तळेखार माजी सरपंच धर्मा पाटील, ज्ञानेश्वर डोलकर, रुपेश चवरकर, सिराज दाखवे, रुस्तम चोगले, प्रमोद नागोठकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## आयुक्त गणेश देशमुख यांचा श्री काळभैरव मंगल कार्यालय ग्रामस्थ समर्थ महिला मंडळा तर्फे सत्कार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगर पालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांचा कळंबोली येथील श्री काळभैरव मंगल कार्यालय ग्रामस्थ समर्थ महिला मंडळा तर्फे सत्कार स्थानिक नगरसेवक रवींद्र भगत यांच्या पुढाकाराने करण्यात आला.



गेल्या चार वर्षापासून सातत्याने श्री काळभैरव मंगल कार्यालय ग्रामस्थ समर्थ महिला मंडळ यांच्याकडे हस्तांतर करण्यात यावा अशी मागणी नगरसेवक रवींद्र भगत यांनी महानगरपालिकेकडे केल्या नंतरही हस्तांतरणाबाबत नकारात्मक भूमिका असल्याने १९ जुलै २०२१ रोजी पनवेल महानगरपालिका कळंबोली वार्ड ऑफिस या ठिकाणी सलग चार दिवस बेमुदत उपोषण केल्यानंतर लेखी स्वरूपात देण्यात आलेले पत्राद्वारे आज महासभेच्या ऑनलाईन सभेमध्ये श्री काळभैरव मंगल कार्यलय हस्तांतर करण्याच्या प्रस्थावाला एक मताने मंजुरी देण्यात आली.त्यानंतर कळंबोली ग्रामस्थ मंडळ व महिला मंडल यांच्या वतीने नगरसेवक रविंद्र अनंत भगत यांचा सत्कार करण्यात आला तसेच मिठाई वाटुन आंनद साजरा करण्यात आला. तसेच कळंबोली कालभैरव मंगल कार्यालय ग्रामस्थ समर्थ महिला मंडळाचा प्रस्ताव महानगरपालिकेने मंजूर केल्याबद्दल आयुक्त गणेश देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.

## एमएसआरडीसीला हुतात्म्यांचे विस्मरण

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत मुरबाड रोड वरील कळंब पोही येथील एम एस आर डी सीने लावलेल्या शासकीय फलकावरील सगुणा बाग या नावाच्या जागी हुतात्मा हिराजी पाटील स्मारकाकडे असे नाव देण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस सागर शेळके यांनी एका पत्राद्वारे केली आहे.

एम एस आर डी सी बांद्रा -मुंबई येथील कार्यकारी अभियंता यांना सागर शेळके यांनी पाठवलेल्या पत्रात भारतीय स्वातंत्र्य लढ्या मध्ये ज्यांनी स्वतःच्या प्राणाची आहुती दिली,इंग्रजांच्या बंदुकीतील गोळ्या आपल्या निधड्या छातीवर घेतल्या,असे हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांच्या मूळ गाव मानिवली येथे कर्जत तालुक्याची अस्मिता असणारे हुतात्मा हिराजी पाटील स्मारक हे नेरळ कळंब रोड वर असून,सदर कळंब पोही रोड वर लावण्यात आलेल्या शासकीय सूचना बोर्डा वर सगुणा बाग हे नाव दिले आहे त्या ठिकाणी हुतात्मा हिराजी पाटील स्मारका कडे असे नाव देण्यात यावे, असे पत्र देण्यात आले आहे, येणाऱ्या वीस दिवसा मध्ये हे नाव बदले नाही गेले तर राष्ट्रवादी युवक काँग्रेस कडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा पत्रात देण्यात आला आहे.

